महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड **लोकनेता**

Lokneta News - लोकनेता न्युज

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे ●

गुरुवार दि.२ एप्रिल २०२६ RNI-MAHMAR/2023/89402 Email : dnyaneshmofficial@gmail.com वर्ष : ०३ अंक : २२९ किंमत २ रुपये 7499615933




# चला, आपणच आपले शहर सुटसुटीत आणि शिस्तबद्ध करुया..हे सर्वांसाठीच आवश्यक आहे!

## प्रशासनाचे धाडसी पाऊल: परळी वैजनाथ नगरपरिषद राबवणार अतिक्रमण हटाव विशेष मोहीम

## ५ एप्रिलपर्यंत स्वयंस्फूर्तीने अतिक्रमण काढण्याचे नागरिकांना आवाहन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

गेल्या अनेक वर्षांपासून परळी शहरातील जवळपास सर्वच रस्त्यांवर अतिक्रमणं मोठ्या प्रमाणावर झालेली आहेत. अतिशय सुटसुटीत व वाहतूकीला विना अडथळा असे समर्पक रुंद रस्ते असतांनाही वाहतूक कोंडी, अस्ताव्यस्त रचना आणि बेशिस्त पार्किंग यामुळे सर्वांनाच प्रचंड त्रासातून जावे लागत आहे. त्यामुळे आपणच आपले शहर सुटसुटीत आणि शिस्तबद्ध करुया ,हे सर्वांसाठीच आवश्यक आहे हा तमाम परळीकर नागरिकांचा मनापासून निर्धार आहे.आता यासाठी नगर परिषद प्रशासनानेही धाडसी पाऊल टाकत परळी वैजनाथ नगरपरिषद अतिक्रमण हटाव विशेष मोहीम राबवणार असल्याची सूचना काढली आहे.

परळी शहरातील वाढत्या अतिक्रमणांमुळे निर्माण झालेली वाहतूक कोंडी, अस्वच्छता आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांच्या पार्श्वभूमीवर नगरपरिषद प्रशासनाने अतिक्रमण हटावाची विशेष मोहीम हाती घेतली आहे. शहरातील मुख्य रस्ते, फूटपाथ, नाले तसेच इतर सार्वजनिक ठिकाणांवर झालेले अतिक्रमण हटवून शहर सुटसुटीत आणि शिस्तबद्ध करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. नगरपरिषदे कडून जाहीर करण्यात आलेल्या सूचनेनुसार, शहरातील सर्व नागरिक, व्यावसायिक व दुकानदारांनी रविवार, दिनांक ५ एप्रिलपर्यंत आपापले अतिक्रमण स्वयंस्फूर्तीने काढून घ्यावे, असे स्पष्ट आवाहन करण्यात आले आहे. ही मुदत अंतिम असल्याचेही प्रशासनाने ठामपणे सांगितले असून, यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

या मोहिमेअंतर्गत रस्त्यांवर अडथळा ठरणारी दुकाने, फेरीवाले, बांधकाम साहित्य, फूटपाथवरील अतिक्रमणे तसेच नाल्यांवर केलेले बेकायदेशीर बांधकाम यांच्यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. अतिक्रमणामुळे वाहतुकीत अडथळे निर्माण होऊन अपघातांचा धोका वाढत असल्याचेही प्रशासनाने नमूद केले आहे.दरम्यान, दिलेल्या मुदतीनंतरही अतिक्रमण कायम ठेवणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता नगरपरिषदेचे पथक थेट अतिक्रमण हटविण्याची कारवाई करणार असून, संबंधितांचे साहित्य जप्त करण्यात येईल. तसेच अतिक्रमण हटविण्याचा खर्च आणि दंडाची रक्कम संबंधितांकडून वसूल केली जाणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईदेखील करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. शहर स्वच्छ, सुंदर आणि वाहतूक कोंडीमुक्त ठेवण्यासाठी ही मोहीम महत्त्वाची ठरणार असल्याचे सांगत नगरपरिषद प्रशासनाने सर्व नागरिक आणि व्यापाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.



# शेती जमिनीवर अतिक्रमणाचा गंभीर प्रकार कारवाई न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

संत चोखामेळा सहकारी संस्था मर्यादित, परळी वै. यांच्या मालकीच्या शेती जमिनीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. सन १९६१-६२ पासून सभासद असलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीवर शेजारील काही व्यक्तींनी बेकायदेशीर कब्जा करून बांधकाम सुरू केल्याने परिसरात संतापाची लाट उसळली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, सर्व्हे नं. ४४० मधील मेसाजी आबाजी जगतकर व सिताराम भोजाजी जगतकर यांच्या सुमारे १० गुंठे जमिनीवर उत्तम भिमा राठोड व संतोष नामदेव राठोड यांनी अतिक्रमण करून थेट बांधकाम सुरू केले आहे. संबंधित बांधकाम तात्काळ थांबवून अतिक्रमण हटविण्याची मागणी करण्यात आली आहे.




तसेच, सर्व्हे नं. ४३९ मधील रामकिशन मिराजी जगतकर यांच्या जमिनीवर रमेश उत्तम गित्ते यांनी १० ु १०० फुट जागेवर कब्जा करत विहिरीचे साहित्य टाकले आहे. हे साहित्य तातडीने हटवून जमीन मूळ मालकांच्या ताब्यात देण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, सर्व्हे नं. ४३९ मधील लक्ष्मण नारायण जगतकर व रानबा किशन ताटे यांच्या जमिनीवर एका शेजार्याने तब्बल एक ते दीड एकर क्षेत्रावर बांधकाम व तळ्याचे साहित्य टाकून अतिक्रमण केल्याचा आरोप आहे.

या सर्व प्रकरणामुळे संत चोखामेळा सहकारी संस्थेचे सभासद आक्रमक झाले असून, प्रशासनाने तात्काळ कारवाई करून अतिक्रमण हटवावे, अन्यथा आम्हाला सनदशीर मार्गाने आमरण उपोषणाला बसावे लागेल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित हस्तक्षेप करून बेकायदेशीर बांधकाम थांबवावे व शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी मोकिंद कोंडीबा जगतकर, ब्रिजेस मेसाजी जगतकर, राजेभाऊ साधु मस्के, चंद्रकांत साधु इंगळे, मधुकर विश्वनाथ जोगदंड, राजेभाऊ विठ्ठल जगतकर आदींनी केली आहे. आता प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# डाळज ते कळस-वालचंदनगर रस्त्याचे काम तात्काळ सुरू करा-मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

## कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या प्रयत्नांना यश!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर,पुणे (बबनराव धायतोंडे)**

इंदापूर तालुक्यातील राज्य महामार्ग क्रमांक ९९ अंतर्गत डाळज ते कळस-वालचंदनगर या रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी संबंधित विभागीय अधिकाऱ्यांना दिले आहेत. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या पाठपुराव्यामुळे हा महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागला आहे.



सदर रस्ता काही तांत्रिक व प्रशासकीय अडचणींमुळे दिर्घकाळ प्रलंबित राहिला होता.त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागत होता.दळणवळणाची समस्या तीव्र झाली असून,स्थानिक पातळीवर याबाबत अनेक आंदोलनेही झाली होती.

या पार्श्वभूमीवर स्थानिक कार्यकर्ते, पदाधिकारी,सरपंच तसेच ग्रामपंचायत सदस्यांनी हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे पाठपुरावा केला होता.याची दखल घेत भरणे यांनी तात्काळ सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याशी संपर्क साधून मंत्रालयात बैठकीचे आयोजन केले.दि.०१ एप्रिल रोजी मंत्रालयात झालेल्या या बैठकीत संबंधित विभागाचे अधिकारी तसेच वालचंदनगर कंपनीच्या अधिकाऱ्यांमध्ये समन्वयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.बैठकीदरम्यान सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी अधिकाऱ्यांना रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या.या बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी,सचिव, कार्यकारी अभियंता,वालचंदनगर कंपनीचे प्रतिनिधी,तसेच जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रतापराव पाटील आणि जिल्हा परिषद सदस्या निर्मलाताई सागर मिसाळ व इतर मान्यवर उपस्थित होते.

या निर्णयामुळे इंदापूर तालुक्यातील दळणवळणाचा मोठा प्रश्न लवकरच सुटणार असल्याने परीसरातील नागरीकांनी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचे आभार व्यक्त केले.

# माणिकगड सिमेंट प्रदूषणावर निर्णायक पाऊल!

## आ.देवराव भोंगळे यांच्या पुढाकाराने कंपनीकडून ठोस उपाययोजनांचे आश्वासन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**चंद्रपूर । सिध्देश्वर केंद्रे**

गडचांदूर परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून माणिकगड सिमेंट कंपनीमुळे निर्माण झालेल्या प्रदूषणाच्या गंभीर समस्येवर अखेर ठोस हालचाल सुरू झाली आहे. आमदार देवराव भोंगळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे कंपनी व्यवस्थापनाने सकारात्मक भूमिका घेत उपाययोजनांची अंमलबजावणी सुरू केल्याचे स्पष्ट झाले आहे.



दि. ३१ मार्च रोजी गडचांदूर येथील शासकीय विश्रामगृहात आमदार भोंगळे यांच्या उपस्थितीत माणिकगड सिमेंट व्यवस्थापन, स्थानिक नागरिक व पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत कंपनीचे युनिट हेड अतुल कन्सल यांनी सध्या सुरू असलेल्या उपाययोजनांची माहिती देत कचऱ्यामुळे होणारा दुर्गंधीयुक्त वास पूर्णपणे नियंत्रणात आणल्याचा दावा केला. तसेच उर्वरित प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी ३० एप्रिलपर्यंत दिलेल्या लेखी आश्वासनाची पूर्तता केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.माणिकगड सिमेंट प्लांटमधून होणाऱ्या धूर, धूळ व कचऱ्याच्या दुर्गंधीयुक्त वासामुळे स्थानिक नागरिक, विशेषतः शालेय विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना खोकला, दमा व डोळ्यांच्या आजारांचा त्रास सहन करावा लागत होता. याशिवाय शेतांवर साचणाऱ्या धुळीमुळे पिकांच्या उत्पादनातही घट होत असल्याची तक्रार नागरिकांनी मांडली होती.

या गंभीर समस्येची दखल घेत आमदार भोंगळे यांनी यापूर्वी २ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेतली होती. तसेच २६ फेब्रुवारी रोजी राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्धा तास चर्चेदरम्यान हा मुद्दा उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधले होते. त्यावेळी संबंधित मंत्र्यांनी कठोर कारवाईचे निर्देश दिले होते.दरम्यान, कंपनीने सकारात्मक प्रतिसाद देत उपाययोजना सुरू केल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, येत्या काळात प्रदूषणमुक्त वातावरणाची अपेक्षा व्यक्त होत आहे.

यावेळी आमदार भोंगळे यांच्यासोबत भाजपचे कोरपना तालुका महामंत्री सतीश उपलेंचवार, सतीश बेतावार, माणिकगड सिमेंट कंपनीचे श्री. गलहोत, राजुरा तालुकाध्यक्ष वामन तुराणकर, नगरसेवक हिमांशू नामवाड, सुरेश मेश्राम, संगीता गावतुरे, महेश शर्मा, विक्की उरकुडे, सूरज पांडे, हरी घोरे, रौफ शेख, गणेश आडे, हंसराज चौधरी, धनंजय छाजेड, सुरेश कांबळे, मनोज भोजेकर, पवन देरकर, भाजपा महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा स्मिता चिताडे, शहराध्यक्षा शितल धोटे, सपना सेलोकर, कीर्ती वैरागडे यांच्यासह भाजपा कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवकाळी पावसासह गारपिटीचा तडाखा

## पाथर्डी तालुक्यात शेतीचे मोठे नुकसान

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बाळासाहेब खेडकर । पाथर्डी**

पाथर्डी तालुक्यात अवकाळी पावसाने अचानक हजेरी लावत अनेक भागांत गारपिटीचा तडाखा दिल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. दुपारनंतर वातावरणात अचानक बदल होऊन वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस सुरू झाला. काही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गारपीट झाल्याने पिके आडवी झाली असून फळबागांनाही फटका बसला आहे.

या अवकाळी पावसामुळे गहू, हरभरा, कांदा तसेच भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान झाले असून शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. अचानक झालेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे काढणीस आलेल्या पिकांचे विशेष नुकसान झाले आहे.

दरम्यान, प्रशासनाने नागरिकांना व शेतकऱ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. वादळी वाऱ्याच्या वेळी झाडाखाली किंवा उघड्यावर थांबू नये, तसेच विजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच शेतकऱ्यांनी नुकसान झालेल्या पिकांची तात्काळ नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.



# मंजरथ वाळू घाटावर अवैध उपसाचा कहर; प्रशासन झोपेत?

## नियम कागदावरच, घाटावर मशिनरीचा उच्छाद!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील मंजरथ वाळू घाटावर सुरू असलेल्या अवैध वाळू उपसाने गंभीर स्वरूप धारण केले असून महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. शासनाच्या नियमांना धाब्यावर बसवत मजुरांऐवजी पोकलेन, जेसीबीसारख्या अवजड मशिनरीच्या साह्याने दिवस-रात्र मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा सुरू असल्याचे चित्र आहे.शासनाच्या नव्या वाळू धोरणानुसार घाटावरून वाळू उपसा हा केवळ मजुरांच्या माध्यमातूनच करणे बंधनकारक असताना मंजरथ घाटावर मात्र याउलट परिस्थिती दिसून येत आहे. अवजड मशिनरीच्या वापरामुळे शेकडो ब्रास वाळू उपसली जात असून ट्रॅक्टर व हायवा वाहनांची सततची वर्दळ सुरू आहे. त्यामुळे नदीपात्राची अक्षरशः चाळण होत असून पर्यावरणावर गंभीर परिणाम होत आहेत.या प्रकारामुळे स्थानिक मजुरांच्या रोजगारावरही गदा आली असून त्यांना कामापासून वंचित राहावे लागत आहे. यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

घाटावर पारदर्शकता राखण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक असताना, मंजरथ घाटावरील कॅमेरे प्रत्यक्ष उत्खनन क्षेत्राऐवजी भलत्याच दिशेला वळविण्यात आल्याचे समोर आले आहे. हा तांत्रिक बिघाड आहे की जाणीवपूर्वक केलेली 'सेटिंग', याबाबत परिसरात चर्चांना उधाण आले आहे.

इतक्या मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन सुरू असताना तहसीलदार रुईकर, उपविभागीय अधिकारी इंगोले किंवा संबंधित महसूल अधिकाऱ्यांना याची माहिती नसावी, यावर नागरिकांचा विश्वास बसत नाही.

# शिवसेनेच्या वतीने खाजगी कोचिंग क्लासेसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची लुट थांबवण्यासाठी शिवसेनेचे आंदोलन

## शिवसेना तालुकाप्रमुख सुनिल पाटील कदम यांनी कोनाळे कोचिंग क्लासेस ला ठोकले टाळे(कुलुप)

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । अनिल पाटील तेलंग**

नांदेड शहरात खाजगी कोचिंग क्लासेस मोठ्या प्रमाणावर सुरू असून खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये नियमांचे सर्रास उलंघन, अव्वाच्या सव्वा फिस घेवून पालक व विद्यार्थ्यांची दिशाभुल व लूट होत असल्याची गंभीर बाब असल्याचे सांगत शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नांदेड उत्तरचे तालुकाप्रमुख सुनिल पाटील कदम यांच्या नेतृत्वात आज दुपारी १२.३० वाजता शिवाजीनगर स्टेडियम परिसरातील कोनाळे कोचिंग क्लासेस समोर आंदोलन करण्यात आले.



या आंदोलनादरम्यान शिवसेना महानगरप्रमुख मनोज यादव,नांदेड दक्षिणचे शहरप्रमुख अर्जुन ठाकुर, युवासेनेचे युवा जिल्हाधिकारी ॲड. अक्षय वटमवार, तालुकासंघटक नवनाथ पाटील जोगदंड, नितीन सरोदे, शहर संघटक मनोज काकडे, उपतालुकाप्रमुख पुरभाजी जाधव, कुंडलीक पाटील शिंदे, गणेश पाटील शिंदे, युवासेना युवा उपजिल्हाधिकारी परवेज शेख, कुंडलिक पाटील मरळकर, शाखाप्रमुख ख्वाजाभाई, मारोती पाटील कदम, श्रीकांत पाटील कदम, राम पाटील कदम,शिवा पाटील कदम, कैलास पाटील जोगदंड, पवन पाटील कदम, प्रभाकर वानेगावकर, सोपान बोकारे, लालचंद यादव, माधवराव कल्याणकर, ओमकार पाटील कदम, भारत पांडे, तुकाराम केळकर, संदिप कासलीवाल यांच्यासह शिवसैनिक, युवासैनिक, पालक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

जय भवानी जय शिवाजी, शिवसेना अंगार है, बंद करा बंद करा शिक्षणाचे बाजारीकरण बंद करा, कोणाळे हाय हाय, कोणाळेचे करायचे काय खाली मुंडके वर पाय अशा गगनभेदी घोषणांनी सर्व परिसर दणानून गेला. नांदेड शहरात अनाधिकृत कोचिंग, बेकायदेशिर प्रवेश, आर्थिक लूटमार या सर्व बाबी शहरातील अनेक कोचिंग क्लासेसमध्ये होत आहे. अनेक कोचिंग क्लासेसमध्ये मोठ्या प्रमाणात फिस घेतली जात आहे, अनेक क्लासेसमध्ये मूलभुत सुविधा शुन्य असून एकप्रकारे क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी असून, पार्किंगची व्यवस्था नाही, सर्रासपणे विद्यार्थी आपल्या गाड्या रस्त्यावर लावतात आणि सकाळी आणि सायंकाळी ट्रॅफिक जाममुळे रस्त्यावर चालणे देखील जमत नाही, गोरगरीब, शेतकरी पालकांची अव्वाच्या सव्वा फिस आकारून मोठ्या प्रमाणात लूट होत आहे, शासन निर्णयाप्रमाणे वर्गात ४० ते ५० विद्यार्थी बसवण्याचा जीआर असताना खाजगी कोचिंग क्लासेसचे व्यवस्थापन एका वर्गात २०० ते ३०० विद्यार्थी बसवतात, ना पार्विंगची व्यवस्था, ना अपत्ती व्यवस्थापनाचे नियम पाळले जातात. इतक्या मोठ्याप्रमाणात प्रवेश दिले जातात पण निकालाचा टक्का कायम घसलेला असतो, शहरात विविध ठिकाणी होर्डिंगस लावून, सोशल मिडीयावर आमच्या क्लासेसचा निकाल १०० टक्के, आमचेच विद्यार्थी निकालात टॉपर असल्याच्या जाहिराती करून गोरगरीब, शेतकरी, पालकांची व विद्यार्थ्यांची दिशाभुल केली तर जातेच पण फिस देखील मोठ्या प्रमाणात घेतली जात आहे. खाजगी क्लासेसचा वाढता सुळसुळाट, शिक्षण का खाजगी व्यवसाय, शिक्षणाच्या नावाखाली पालकांची आर्थिक लूट बंद करा, असे सुनिल पाटील कदम यांनी यावेळी सांगितले.

औद्योगिक वसाहतीमध्ये मोठमोठ्या टोलेजंग अनाधिकृत इमारती उभारून, ना पार्किंगची व्यवस्था, ना आपती व्यवस्थापनाचे नियम मोडीत काढत नियमांचे पायमल्ली करताना दिसत आहे. मराठी शाळा, महाविद्यालये हे केवळ प्रवेशासाठी राहिले आहेत, विद्यार्थी मात्र खाजगी शिकवणीला जात आहेत. येणार्या काळात नियम पाळून शिकवणी चालू ठेवावी, शेतकर्यांच्या पाल्यांना प्रवेशाच्या १० टक्के मोफत शिकवणी द्यावी, दरवर्षी शेतकरी व गोरगरीब विद्यार्थ्यांना फिसमध्ये सवलत द्यावी असे जर आढळून आले नाही तर शिवसेनेच्या वतीने तिव्र आंदोलनाचा इशारा देत कोणाळे कोचिंग क्लासेसचे व्यवस्थापक योगेश पाटील यांच्याकडे निवेदन देण्यात आले. निवेदन दिल्यानंतर योगेश पाटील यांनी शेतकर्यांच्या पाल्यांना १० टक्के फिसमध्ये सवलत देण्याबाबत १०० टक्के प्रयत्न करण्यात येईल व निवेदनात मागितलेल्या मागण्याची माहिती दोन दिवसात सुनिल पाटील कदम आणि शिवसैनिकांना देण्यात येईल, असे आश्वासीत केल्यानंतर हे आंदोलन संपल्याचे सांगीतले.

# शिक्षक हरीश धर्मा भोंडकर यांना महारक्षक पुरस्कार प्रदान

## सर्वच स्तरातून कौतुकाचा वर्षाव

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उरण । विठ्ठल ममताबादे**

विष्णुदास भावे नाट्यगृह सभागृह वाशी नवी मुंबई येथे सारथी सेवा संस्था द्वारे सेंट मेरीज जे. एन. पी. शाळेचे शिक्षक हरीश धर्मा भोंडकर यांना महारक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार हा रस्ता सुरक्षा अभियान, गणपती विसर्जन व इलेक्शन ड्युटी साठी विशेष पोलीस अधिकारी म्हणून ड्युटी केल्याबद्दल, अपघातग्रस्तांना मदत केल्याबद्दल, दरवर्षी रक्तदान केल्याबद्दल, शालेय विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्च पास्ट संचलनाबरोबरच वाहतूक सुरक्षा व नागरी संरक्षण दल याबद्दल माहिती दिल्याबद्दल देण्यात आला. या विशिष्ट पुरस्काराबद्दल त्यांच्या शाळेचे मुख्याध्यापक राजेश अल्फोंस यांनी देखील कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. समाजसेवेचे




कार्य करत असताना त्यांना जी प्रेरणा मिळाली ती त्यांचे गुरुवर्य विलास पाटील यांच्याकडून.विलास पाटील हे त्यांचे आदर्श आहेत.समाजाची कोणत्या ना कोणत्या माध्यमातून सेवा करण्याचा हरीश धर्मा भोंडकर नेहमी प्रयत्न करत असतात व इतरांनाही प्रेरित करतात.त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत आजपर्यंत त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. अनेक ठिकाणी त्यांचा मानसन्मान सुद्धा झाला आहे.शिक्षक हरीश धर्मा भोंडकर यांना महारक्षक पुरस्कार मिळाल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# शिवछत्रपती महाविद्यालयात हिंदी शायरी व ग़ज़ल गायन कार्यक्रम उत्साहात संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाचोड । त्रिसिंग जायभाये**

शिवछत्रपती कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे ' हिंदी शायरी व ग़ज़ल गायन 'कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि सांस्कृतिक वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. मधुकरराव जोशी आणि मा. श्री. अर्जुनराव जयरंगे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख डॉ. उत्तम जाधव यांनी केले. त्यांनी शायरी व ग़ज़ल या काव्यप्रकाराचे महत्त्व, त्याची समृद्ध परंपरा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील योगदान यावर प्रकाश टाकला.

यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या हिंदी शायरी व ग़ज़लांनी वातावरण भारावून गेले. सुरेल आवाज, भावपूर्ण अभिव्यक्ती आणि सुंदर सादरीकरणामुळे उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. प्रमुख पाहुण्यांचे मनोगत:



मा. श्री. मधुकरराव जोशी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, शायरी व ग़ज़ल हा केवळ काव्यप्रकार नसून तो भावनांचा अत्यंत सूक्ष्म आणि प्रभावी आविष्कार आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या शेर व ग़ज़लांमधून त्यांची कलात्मकता, भाषेवरील पकड आणि सर्जनशीलता स्पष्टपणे दिसून आली. अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो तसेच भारतीय साहित्य आणि संस्कृतीची जपणूक होते, असे त्यांनी नमूद केले. प्रमुख पाहुणे मा. श्री. अर्जुनराव जयरंगे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. त्यांनी सांगितले की, आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगातही विद्यार्थ्यांनी शायरी व ग़ज़लसारख्या पारंपरिक काव्यप्रकाराकडे वळणे ही अत्यंत आनंदाची बाब आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता, संवेदनशीलता आणि अभिव्यक्ती कौशल्य विकसित होते. त्यांनी महाविद्यालयाच्या हिंदी विभागाचे विशेष अभिनंदन करत भविष्यातही असेच दर्जेदार कार्यक्रम आयोजित करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी शायरी व गझलची परंपरा व हे काव्यप्रकार अरबी फारसी भाषेतून हिंदी मध्ये आला. शायरी व गझल ही भावनात्मक अभिव्यक्ती आहे. प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे, अर्जून जयरंगे आणि मधुकर जोशी यांनी मनोरंजक शेरोशायरी सादर करून विद्यार्थ्यांमध्ये हास्याचे फवारे उडवून दिले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. तुकाराम गावंडे यांनी ओघवत्या शैलीत केले, डॉ. शिवाजी यादव यांनी आभार मानले. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला असून विद्यार्थ्यांना आपली कला सादर करण्याची एक उत्तम संधी मिळाली.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत रामबापु मेटकर विद्यालयाची रेश्मा राठोड हिची नांदेड पोलिस दलात निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगांव । चंद्रकांत भोरे**

तालुक्यातील लोहा तांडा येथील संत रामबापु मेटकर विद्यालय, लोहा येथील विद्यार्थिनी रेश्मा भिमराव राठोड हिची नांदेड पोलिस दलात निवड झाली आहे. तिच्या या यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला.रेश्माने अफाट जिद्द, कठोर परिश्रम आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर हे यश संपादन केले. तिच्या निवडीमुळे विद्यालयासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी तिचे यश



प्रेरणादायी ठरत आहे.सत्कार समारंभाला रेश्माची आई व भाऊ उपस्थित होते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक ताडेराव सर, वळसे सर, कदम सर, सुजाता हूरदुके मॅडम, देशमुखे सर, संस्थेच्या अध्यक्षा सौ. निर्मला मुरमुरे, सचिव संतोष डवरे, संचालक गणपत मुरमुरे, तुकाराम डवरे, शोभाताई देशमुखे, शिक्षकेत्तर कर्मचारी रामदास धुमाळे, संध्या पवार, आनंद राणे, माजी मुख्याध्यापक राऊत सर, शेटे सर आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमात रेश्माचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. मान्यवरांनी तिच्या यशाबद्दल अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी सातत्याने प्रयत्न केले. या प्रवासात विद्यालयातील शिक्षकांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. पुढेही यशाची वाटचाल सुरूच ठेवणार आहे.**

– रेश्मा भिमराव राठोड.

**आमच्या शाळेतील रेश्मा ही अतिशय हुशार आणि कष्टाळू मुलगी, तिची अभ्यासविषय असणारी आस्था पाहून आम्ही तिच्याकरिता वेगळे प्रयत्न करत असू आमच्या शाळेतील श्री. वळसे सर, कदम सर आणि मी वेळोवेळी स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन करत होतो त्याच बरोबर शाळेत असताना तिला वेगवेगळ्या प्रकारच्या स्पर्धा परीक्षेत यश कसे मिळवावे याचे मार्गदर्शन केले, संस्थेचे संस्थापक सचिव कालवश रामरावजी डवरे साहेब यांच्या पुण्याईने खेड्यापाड्यातील विद्यार्थी यश संपादन करत आहेत याचे मोठे समाधान आहे.**

–श्री. ताडेराव डी. डी., मुख्याध्यापक,
संत रामबापु मेटकर विद्यालय लोहा

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या किसान सेलच्या महत्त्वपूर्ण नियुक्त्या जाहीर जनार्दन सूर्यवंशी हरडफकर यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगाव । कृष्णा पाटील हरडफकर**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या किसान सेल अंतर्गत हदगाव तालुक्यात नुकत्याच महत्त्वाच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेला मेळावा अतिशय उत्साही वातावरणात पार पडला.

या मेळाव्यात नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या, ज्यामध्ये:

रामेश्वर शिंदे (उमरीकर): यांची किसान सेलच्या हदगाव तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

जनार्दन सूर्यवंशी (हडपकर): यांची नांदेड जिल्हा उत्तर किसान सेलच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड जाहीर करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राष्ट्रवादी काँग्रेस (उत्तर) नांदेडचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावणगावकर यांनी भूषवले. महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस किसान सेलचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मनकर यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.



यावेळी हदगाव-हिमायतनगर विधानसभा अध्यक्ष एकनाथ जाधव, नांदेड जिल्हा किसान सेलचे जिल्हाध्यक्ष जगदाळे, ओबीसी जिल्हाध्यक्ष अभिषेक लुटे, हदगाव तालुकाध्यक्ष निळू पाटील, हिमायतनगर तालुका अध्यक्ष वामनराव मिराशी यांच्यासह अनेक मान्यवर आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात नव्याने नियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला असून, त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. या नियुक्त्यांमुळे शेतकरी प्रश्न सोडवण्यासाठी संघटनात्मक पातळीवर मोठी बळकटी मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# महिला सक्षमीकरण चळवळ यशस्वी करण्यासाठी पुरुषांच्या विचार व वर्तनात बदल आवश्यक प्रा.बा.रा.कत्तुरवार



लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । संतोष चिद्रावार लोणीकर**

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर देशात सांसदीय लोकशाही व लोककल्याणकारी राज्याच्या संकल्पनेचा स्वीकार करण्यात आला. राज्यघटनेनुसार कायद्याचे राज्य, स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, दर्जा व संधीची समानता , धर्मनिरपेक्षता , समाजवाद , इत्यादी आदर्श मानवी लोकशाही मुल्यांचा स्वीकार करण्यात आला. आदर्श स्वरुपाची शासन व प्रशासन व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. या शासन व प्रशासन व्यवस्थेत निसर्गतः लोकसंख्येत ५० टक्के वाटा असलेल्या महिलांना दर्जाची व संधीची समानता या तत्वानुसार आर्थिक,सामाजिक,राजकीय, प्रशासकीय व व्यावसायिक क्षेत्रात समानता प्राप्त होणे आवश्यक होते. परंतु पुरुषप्रधान संस्कृती प्रभावामुळे महिला व मागासवर्गीय या दोन्ही समाज घटकाला उपेक्षित व वंचित जीवन जगावे लागत होते. अलीकडच्या काळात शिक्षणाच्या माध्यमातून महिलांच्या सर्वांगीण विकासाला निर्णायक वळण प्राप्त झाले आहे. गावच्या ग्रामपंचायत सदस्यापासून ते देशाच्या सर्वोच अशा महामहीम राष्ट्रपतीपदापर्यंत महिलांनी गरुडझेप घेतली आहे.महिला सक्षमीकरण चळवळ अधिकाधिक यशस्वी करण्यासाठी पुरुषांच्या विचार व वर्तनात बदल आवश्यक आहे,असे प्रतिपादन देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्रप्रमुख प्रा.डॉ.बा.रा.कत्तुरवार यांनी केले आहे. ते महाराष्ट्र उद्योजगता विकास केंद्र महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ व जिल्हा उद्योग केंद्र नांदेड यांच्यावतीने देगलूर येथे आयोजित केलेल्या सेंसीटायझेशन आणि क्षमता वृद्धीवर आधारित कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानीस्थानी कार्यशाळा समन्वयक शीतल अजित वरणे ह्या होत्या.सर्व महिला वर्गाला शासन, प्रशासन व उद्योग क्षेत्रातील दुहेरी जबाबदारी पार पाडवी लागते. एक म्हणजे कौटुंबिक आणि दुसरी म्हणजे शासन, प्रशासन व उद्योग क्षेत्रातील जबाबदारी होय. महिला अधिकारी , कर्मचारी व उद्योजक वर्गाला पुरुषांच्या तुलनेत अधिक संघर्ष व एक प्रकारे तारेवरची कसरत करावी लागते. त्यासाठी महिला व पुरुष या दोन्ही घटकांनी आपण एका आदर्श कुटुंबरुपी रथाचे दोन चाके आहोत आशा स्वरुपात परस्परांना समजून घेतले पाहिजे, कुटुंबातील दोन्ही चाके समान असून यातील कोणताही एक चाक रुतला किंवा डगमगला तर त्याचा प्रतिकूल परिणाम समग्र कुटुंबावर होत असतो. त्यासाठी महिला सक्षमीकरण चळवळ यशस्वी करण्यासाठी पुरुषांच्या विचार व वर्तनात बदल आवश्यक आहे. असे प्रतिपादन त्यांनी केले. याप्रसंगी तालुक्यातील नवोदित महिला उद्योजक उपस्थित होते.

# जिल्ह्यात १ ते ४ एप्रिल या चार दिवसांसाठी यलो अलर्ट जारी विजेच्या कडकडाटासह मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता

लोकनेता न्यूज नेटवर्क
**नांदेड | प्रतिनिधी**

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी १ एप्रिल रोजी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी १ ते ४ एप्रिल २०२६ या चार दिवसांसाठी यलो अलर्ट जारी केलेला आहे. हे चार दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि नागरिकांनी खबरदारी घ्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

**या गोष्टी करा**

विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा.

**या गोष्टी करु नका**

आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे टाकू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे.



# मुखेडात गॅस दरवाढ विरोधात काँग्रेसचे 'फेकूदिन' आंदोलन युद्ध नको बुद्ध हवा चा दिला नारा

लोकनेता न्यूज नेटवर्क
**मुखेड | संजय यलमवाड**




मुखेड केंद्र सरकारच्या गॅस दरवाढ विरोधात एप्रिल फुलचे औचित्य साधून मुखेड काँग्रेस कडून 'कहा गये अच्छे दिन' म्हणत व नालीतून गॅस काढून चहा करत फेकू दिन साजरा करण्यात आला.

केंद्राच्या नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने आज सुमारे दोनशे रुपयाची व्यावसायिक गॅस दरवाढ जाहीर केली. त्या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेश सरचिटणीस डॉ.श्रावण रॅपनवाड यांच्या नेतृत्वात, तालुका कार्याध्यक्ष संभाजी पाटील उंद्रीकर आणि शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर यांच्या उपस्थितीत एप्रिल फुल चे औचित्य साधून मुखेड तहसिल कार्यालयासमोर मुख्य रस्त्यावरील नाल्यावर कार्यकर्त्यांनी आंदोलन केले.यावेळी मोदींनी म्हटल्याप्रमाणे नालीतून गॅस काढून प्रतिकात्मक चहा करण्यात आला.तर नागरिकांना आवाहन करून चहा वाटप करण्यात आले.यावेळी चालू असलेल्या इराण इस्त्राईल आणि अमेरिका यांच्या युद्धाबद्दल पागल मित्र ट्रम्प यांना मोदींनी युद्ध थांबवण्यास सांगावे असे सांगत बॅनर लावण्यात आले.बॅनर वर सांगा आपल्या पागल मित्राला (ट्रम्पला ) 'युद्ध नको बुद्ध हवा,अस्त्र क्रांती नको,विश्वशांती हवी' असा मथळा काँग्रेसकडून ठळक लिहिण्यात आला होता.या आंदोलनातून नालीच्या गॅसवर चहा करणे हे मोदींचे किती मूर्खपणाचे विधान होते हे काँग्रेसने दाखवले आहे. यावेळी जगातील युद्ध आणि देशातील महागाई या विरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.युद्धामुळे भारतात महागाई वाढवून जनतेला प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे.युद्ध पेटवणारे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे मोदीचे मित्र असून त्यांनी आपल्या मित्र असणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांना युद्ध थांबवावे असा सल्ला द्यावा असा सल्ला यावेळी तालुका कार्याध्यक्ष संभाजी पाटील उंद्रीकर यांनी दिला.या आंदोलनात डॉ.श्रावण रॅपनवाड,संभाजी पाटील,हणमंत नारनाळीकर सह युवक काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस सुनील आरगिळे,भाई असद बल्की,ओबीसी विभाग शहराध्यक्ष प्रकाश निमलवाड, शिवाजी चैनपुरे,राजुभाऊ बनसोडे,हाफिज पठाण,एम.आर.गोपनर,बालाजी वाडेकर,शिवाजी कांबळे,शिवाजी गायकवाड,वाहनचालक ईमामभाई, सुर्यकांत पांचाळ सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.प्रतिकात्मक आंदोलनास नागरीकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देऊन आंदोलन कर्त्यांचा चहा पिऊन गॅसदरवाढीचा तिव्र निषेध केला

# तुंगी (बु) विविध कार्यकारी सहकारी सोसायटीची १००%कर्ज वसुली

## २०१५ साली चेअरमन पदाची सुत्र हातात घेतल्यापासुन आज २०२६ सालापर्यंत सलग ११ वर्ष संस्थेची १००% वसुली

लोकनेता न्यूज नेटवर्क
**जिवन जाधव | औसा**



लातुर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा जवळगा पोमादेवी च्या वतीने चेअरमन रमेश पवार यांचा सत्कार संपन्न ,औसा तालुक्यातील पोमादेवी जवळगा अंतर्गत बॅकस्तरावर तुंगी बु विवीध कार्यकारी सहकारी संस्थेची वसुली १००% झाल्याने संस्था चेअरमन रमेश पवार ,व्हॉ चेअरमन संदिपान जाधव ,गटसचिव उद्धव कोव्हाळे यांचा बँकेच्या वतिने सत्कार करण्यात आला ,पोमादेवी जवळगा बँक अंतर्गत तुंगी बु गावची विवीध विकास कार्यकारी संस्थेची वसुली व वसुलपात्र बाकी रु ९कोटी ४० लाख रकमेची विक्रमी लातुर जिल्यात सर्वप्रथम १००% वसुली करणारी अग्रगण्य संस्था तुंगी बु यांनी केली असुन दरवर्षी १००% कर्ज वसुली करणारी संस्था मनुनही या संस्थेकडे पाहील जात यावेळी संस्थेचे चेअरमन, मा. श्री. रमेशजी पवार यांचा सत्कार लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे औसा तालुका फिल्ड ऑफिसर श्री. गणेश भटकर व लातूर जिल्हा बँक कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री. गोविंद कोळपे , शाखा तपासणीस श्री. जोगी , व शाखा व्यवस्थापक श्री. कदम व श्री. जिडगे साहेब, नितीन गुत्ते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळीचेअरमन रमेश पवार ,व्हॉ चेअरमन संदिपान जाधव ,गटसचिव उद्धव कोव्हाळे ,सदस्य मनोहर जाधव, राजकुमार सगर, दयानंद महाडक, बालाजी सूर्यवंशी,हबीब शेख, मुस्तफा देशमुख, गणेश सूर्यवंशी, महादेव भावले, तुकाराम घोडके, कालिंदा चव्हाण, भगीरथीबाई काळे यांचा संस्था सभासद शेतकरी व तुंगी बु ग्रामस्थांनी चेअरमन रमेश पवार व्हॉ चेअरमन संदिपान जाधव सह सदस्य यांचे अभिनंदन केले ,

# सुफी मित्र परिवार आयोजित देगलूर प्रस्तुत अंतर्नाद आठवी दिनांक २९-३-२०२६ रविवार सायं.६:००.वा.वरिष्ठ पत्रकार शिवानंद स्वामी यांच्या निवासस्थानी पार पाडली

लोकनेता न्यूज नेटवर्क
**देगलूर | वंकलवार प्रभू**

मासिक संगीत सभा संध्याकाळची प्रसन्नता श्रोत्यांची गर्दी आणि कार्यक्रमाची लोकप्रियता यामुळे कार्यक्रम अविस्मरणीय ठरला.आल्हाददायक वातावरण श्रोत्यांच्या सहभाग कार्यक्रमाच्या यशाचा उल्लेख दिसला.

कार्यक्रमाच्या दीप प्रज्वलन गुरुवर्य पंडित बाबुराव उप्पलवार गुरुजीश्री खंडागळे सर, सुफी मित्र परिवार अध्यक्ष शबाना हसमी, संगीत साधना मंच अध्यक्ष लक्ष्मणअमृतवार यांच्या हस्ते कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वरिष्ठ पत्रकार शिवानंद स्वामी यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, नामांकित डॉक्टर, विविध क्षेत्रातील तज्ञ मंडळी, नगर सेवक,स्थानिक कलाकार सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात विशेष सत्कारामध्ये कलागुणात उंच भरारी घेणाऱ्या मुलामध्ये त्यामध्ये अनहद वारसी, वेदांत येळगे यांचा सत्कार करण्यात आला.

ऐनुद्दीन सरांच्या शिष्या वैष्णवी प्रभू वंकलवार यांच्या बासरी वाजनाने कार्यक्रमाची सुरुवात केली.






सुरवातीस श्री बाळासाहेब पाटील यांनी भक्ती गीतातून सर्वांना मंत्रमुग्ध केले, स्थानिककलाकारश्री श्यामसुंदर ,लक्ष्मणअमृतवार

श्री शिवानंद स्वामी,श्री ऐनुद्दीन वारसी,श्री बाळासाहेब पाटील,श्री चंद्रशेखर कौरवार,श्री गोविंद सुवर्णकार,श्री शीतलकुलकर्णी,संतोष मॅठदेवरू डॉ शिवकार्तिक स्वामी, रमा देशपांडे, डॉ.भडके सर, पटने सर, गंगाधर आप्पा स्वामी, बस्व स्वामी, या सर्वांनी हिंदी व मराठी गीतातून अतिशय उत्तम प्रस्तुतीकरणाद्वारे श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमात बाहेरील कलाकारांनी सुद्धा अतिशय उत्तम सादरीकरणातून श्रोत्यांची मन जिंकून घेतले.

वादनामध्ये श्री प्रकाश सोनकांबळे- तबला,श्री गंगाधर सुगावकर - तबला, श्री बालाजी सुगावकर सर - हार्मोनियम यांनी लक्षणीय वादन केले.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे - ऐनुद्दीन सर व यांचा संच यांचे सामूहिक बासरी वादन करण्यात आले.

या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थिती लाभलेले - सुजाता कुलकर्णी,स्वामी मॅडम,सुभाकर ताई, डॉ.नागठाणे सर, वंकलवार प्रभू सर,दुडकवार सर, कळसकर सर ,मोतेवर सर,सोमेश मदनूरकर, सुदर्शन सरसर, माधव येळगे, काब्दे यशवंत उपस्थित सर्व रसिक मंडळी.

शेवटी या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री खंडागळे सर यांनी आपल्या भाषाशैलीतून व्यक्त केला.हा कार्यक्रम एक अद्भुत अनुभव होता.

# खेड्या पाड्या मध्ये वीज पुरवठा बंद करण्याचे आदेश थांबवा..नाहीतर लवकरच अंदोलन करेल

## रा. को. अ. गट युवा नेता श्री.पवनभाऊ चव्हाण कणकीकर यांचा...महावितरणला इशारा

लोकनेता न्यूज नेटवर्क
**मांडवी/पिपंळगाव | डॉ.भारत उद्धव राठोड**

किनवट.तालुक्यातील पिपंळगाव मांडवी सर्कल मध्ये थकबाकीच्या नावाखाली अनेक गावांचा वीज पुरवठा खंडित करण्याचा महावितरण विभागाने घेतलेला निर्णय हा अत्यंत चुकीचा,अन्यायकारक आणि सर्वसामान्य जनतेला वेठीस धरणारा आहे. वीज पुरवठा खंडित करण्याचा निर्णय महावितरणने तात्काळ थांबवावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, अशा इशारा रा. को युवा नेता श्री. पवनभाऊ चव्हाण यांनी दिला आहे.थकबाकीच्या नावाखाली तालुक्यातील अनेक गावांचा वीज पुरवठा खंडित करण्याचे सत्र महावितरणच्यावतीने सुरु करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर श्री.पवनभाऊ चव्हाण यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आधीच अवकाळी पाऊस, शेतीमालाचे नुकसान, आर्थिक संकट आणि पिण्याच्या पाण्याच्या समस्येमुळे शेतकरी व ग्रामीण जनता प्रचंड अडचणीत असताना महावितरणने घेतलेला हा निर्णय संतापजनक असल्याचे ते म्हणाले.काही व्यक्ती अथवा काही गावांमध्ये थकबाकी असू शकते; मात्र त्याचा फटका संपूर्ण गावातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, लहान व्यावसायिक आणि पाणीपुरवठा व्यवस्थेला बसणे हा अन्यायाचा कळस आहे.



थकबाकी वसुलीच्या नावाखाली जनतेला अंधारात ढकलण्याचा अधिकार कोणत्याही यंत्रणेला नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.वीज पुरवठा बंद झाल्यामुळे मोटारपंप बंद पडले असून पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकर्यांची पिके धोक्यात आली आहेत, विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत आहे, किरकोळ व्यवसाय व उद्योगधंदे ठप्प झाले आहेत.महावितरणने थकबाकी वसुलीसाठी संवाद, हप्ते, विशेष मोहीम किंवा स्थानिक स्तरावर समन्वयाचा मार्ग स्वीकारण्याऐवजी थेट वीज पुरवठा खंडित करण्याचा टोकाचा निर्णय घेऊन आपली असंवेदनशीलता दाखवून दिली आहे. हा निर्णय जनतेच्या सहनशीलतेचा अंत पाहणारा असून लोकांमध्ये तीव्र रोष निर्माण झाला आहे. तालुका प्रशासनाने या गंभीर विषयात तात्काळ हस्तक्षेप करून महावितरणचा हा जनविरोधी आदेश त्वरित रद्द करावा आणि संबंधित गावांचा वीज पुरवठा पूर्ववत सुरू करावा. अन्यथा जनतेच्या वाढत्या संतापाचा उद्रेक होऊन निर्माण होणार्या परिस्थितीस पूर्णपणे प्रशासन आणि महावितरण जबाबदार राहील. जनतेच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणार्या अशा निर्णयाविरोधात लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे

# नांदेडमध्ये स्थानिक गुन्हे शाखेकडून ६.७५ लाखांचा गांजा जप्त; अर्धापूर हद्दीत मोठी कारवाई



लोकनेता न्यूज नेटवर्क
**नांदेड | अनिल पाटील तेलंग**

नांदेड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरुद्ध मोहीम उघडण्याचे आदेश दिले होते. या अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने अर्धापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत धडक कारवाई केली. भाऊराव चव्हाण कारखान्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर दशरथ कपाटे यांच्या शेताजवळ काही तरुण अंमली पदार्थांची तस्करी करत असल्याची गोपनीय माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक रवि वाहुळे यांना मिळाली होती. मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी शासकीय पंच आणि राजपत्रित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सापळा रचून धाड टाकली. यावेळी एका स्विफ्ट डिझायर कारची (क्र. MH 24 AF 1807) झडती घेतली असता, त्यामध्ये ४ किलो ५१० ग्रॅम गांजा आढळला. जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत २ लाख २५ हजार ५०० रुपये असून, ४ लाख ५० हजार रुपये किमतीची कार असा एकूण ६ लाख ७५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

या प्रकरणी पोलिसांनी शेख अरबाज शेख बाबु (वय २२, रा. रशिद टेकडी, भोकर) याला ताब्यात घेतले असून, त्याचा साथीदार शेख फयुम शेख मुफ्तु (रा. सईदनगर, भोकर) हा फरार झाला आहे. दोन्ही आरोपींविरुद्ध अर्धापूर पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस. कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या यशस्वी कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाचे कौतुक केले आहे.

# पोलीस ठाणे वाढवणा (बु.)हद्दीत कॉपर वायर चोरी चोरीच्या ५ प्रकरणांचा उलगडा ५ आंतरराज्यीय आरोपी अटकेत

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । एल पी उगीले**

उदगीर तालुक्यातील पोलीस ठाणे वाढवणा (बु.) हद्दीत घडलेल्या कॉपर वायर चोरीच्या सलग घटनांचा उलगडा करण्यात पोलीस प्रशासनास महत्त्वपूर्ण यश प्राप्त झाले आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या पाणबुडी मोटारींना जोडलेले कॉपर वायर चोरी करून मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान करून चोरी करणाऱ्या आंतरराजीय टोळीचा पर्दाफाश करण्यात आला असून या प्रकरणात एकूण पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी पोलीस ठाणे वाढवणा (बु.) येथे गुरनं ७८/२६ व ८०/२६ अन्वये कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. फिर्यादी बालाजी धनराज तरवडे (रा. वाढवणा बु.) व इतर शेतकऱ्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दिनांक २६/०३/२०२६ ते २७/०३/२०२६ दरम्यान मौजे एकुर्का रोड परिसरातील साठवण तलावा जवळील डी.पी.वरून सुमारे १०५० मीटर कॉपर वायर (किंमत ८४,०००/-) अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले होते. तसेच दुसऱ्या घटनेत डांगेवाडी परिसरातील साठवण तलावावरील डी.पी.वरून ४६१ मीटर कॉपर वायर (किंमत ३६,८८०/-) चोरीस गेले होते. अशा प्रकारे एकूण १२०,८८०/- किमतीचा मुद्देमाल चोरीस गेला होता.

या घटनांचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्देशानुसार तसेच अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण व उपविभागीय पोलीस अधिकारी अहमदपूर अरविंद रायबोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे वाढवणा (बु.) येथे विशेष तपास पथक गठीत करण्यात आले. तपासादरम्यान घटनास्थळांचे बारकाईने निरीक्षण, तांत्रिक विश्लेषण, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजचा अभ्यास, तसेच गोपनीय माहितीदार सक्रिय करून आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू करण्यात आले होते.तपासादरम्यान मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पोलीस पथकाने वाढवणा पाटी परिसरात सापळा रचून संशयितांना ताब्यात घेतले. सखोल चौकशीअंती आरोपींनी गुन्हा केल्याची कबुली दिली. अटक आरोपींची नावे पुढीलप्रमाणे रिहाईस जिवराज पवार (वय २४ वर्ष),सुजेश नवाब पवार (वय २६ वर्ष),दुकीस मलबकस पवार (वय ३५ वर्ष),सासन सार्जन पवार (वय २४ वर्ष),बबू जिवराज पवार (वय २६ वर्ष,सर्व रा. सुगवा ललतपुर, ता. रिटी, जि.



कटनी, राज्य मध्यप्रदेश)असे असून आरोपींनी वाढवणा, अहमदपूर, जळकोट, उदगीर व कमलनगर (कर्नाटक राज्य) परिसरात अशाच प्रकारच्या चोरीच्या घटना केल्याची कबुली दिली आहे. चोरी केलेले वायर जाळून त्यातून तांबे वेगळे करून ते विक्रीसाठी वापरण्याची त्यांची पद्धत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

अधिक तपासात असे निष्पन्न झाले आहे की सदरचे आरोपी हे गावाजवळील मोकळ्या जागेत वास्तव्य करून किंवा शेतात कामाच्या बहाण्याने येऊन रेकी करून अशा प्रकारच्या चोऱ्या करत होते.

अटक आरोपींपैकी रिहाईस जिवराज पवार याच्याकडून सुमारे २३ किलो कॉपर वायर जप्त करण्यात आले आहे. तसेच आरोपींकडून रेडमी, विवो व आयक्यू कंपनीचे एकूण ४ मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहे. याशिवाय आरोपींकडे सोन्यासारखे दिसणारे प्युअर गोल्ड ९९९ असा ठसा असलेले बनावट धातूचे बिस्कीट स्वरूपातील साहित्यही आढळून आले असून ते पितळ असल्याचे निष्पन्न झाले आहे. या माध्यमातून फसवणुकीचा गुन्हा झाला आहे का? याचाही तपास सुरू आहे.

तपासादरम्यान आरोपींनी चोरी केलेले तांबे काही भंगार विक्रेत्यांना विक्री केल्याची माहिती समोर आली असून त्याबाबत पुढील तपास सुरू आहे. तसेच आरोपींच्या इतर साथीदारांचा शोध व इतर गुन्ह्यांतील सहभागाबाबत सखोल तपास सुरू आहे.

ही संपूर्ण कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे वाढवणा (बु.) चे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील गायकवाड यांच्या नेतृत्वातील पथकामधील तसेच तपासी अधिकारी तुकाराम बळदे, शिवप्रताप रंगवाळ,संजय दळवे , बालाजी आकेमोड, शिवाजी केंद्रे , गोरख कसबे, राजेश कंचे यांच्या पथकाने अत्यंत कौशल्याने पार पाडली आहे. पोलीस अधिकारी व अंमलदारांनी दाखविलेल्या तत्परता, समन्वय व व्यावसायिकतेमुळे अल्पावधीत गुन्ह्याचा उलगडा होणे शक्य झाले.तसेच पोलिसांना आरोपी धरण्यासाठी पोलीस मित्र आकाश नागपूर्णे , सिद्धेश्वर गुद्दे यांनी सहकार्य केले आहे.

सदर प्रकरणातील अटक आरोपींना न्यायालयात हजर करून पुढील तपासासाठी पोलीस कोठडीची मागणी करण्यात आली आहे.गुन्ह्याचा सखोल तपास सुरू आहे.पोलीस प्रशासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, आपले गावात, गावाशेजारी वास्तव्यास किंवा शेतात काम करण्याच्या बहाण्याने कोणीही अनोळखी व्यक्ती अथवा टोळी निर्दशनास येत असेल व आपणास त्यांच्याबद्दल वाजवी संशय येत असेल तर आपण नजीकच्या पोलीस स्टेशनची संपर्क साधून तात्काळ माहिती देण्यात यावी.

# युथ आयकॉन रिपब्लिकन सेनेचे युवा नेते अ‍ॅड.अमन आंबेडकर यांचा हदगाव येथे भव्य सत्कार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगांव । चंद्रकांत भोरे**

रिपब्लिकन सेनेचे युवा नेते युथ आयकॉन अँड.अमन भैय्या आंबेडकर साहेब हे दि. ३१/०३/२०२६ रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. सायं. ७.३० वाजता त्यांचे हदगाव शहरात आगमन झाले.

हदगांव येथील महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक येथे त्यांचा सर्व बौद्ध समाज बांधवांच्या वतीने व रिपब्लिकन सेना हदगांव तालुक्याच्या वतीने भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळेस उपस्थित बौद्ध बांधव, रिपब्लिकन सेनेचे सर्व पदाधिकारी,समता सैनिक दलातील



बांधव,भारतीय बौद्ध महासभा शाखा हदगाव ची पदाधिकारी उपस्थित होते.

त्यानंतर अँड. अमन भैय्या आंबेडकर साहेब यांच्या हस्ते हदगाव तालुक्यातील तळेगाव येथे रिपब्लिकन सेनेच्या शाखा बोर्डाचे अनावरण मोठ्या उत्साहात करण्यात आले. यावेळी प्रदेशाध्यक्ष श्री. सुशिल सुर्यवंशी, सुनिल भाऊ सोनसळे, जिल्हाध्यक्ष उत्तर नांदेड, महेंद्र भाऊ धोंगडे विधानसभा अध्यक्ष, हदगाव शहर अध्यक्ष चंद्रकांत भोरे, हदगांव, युवा तालुका अध्यक्ष राष्ट्रदिप वाढवे रिपब्लिकन सेना हदगाव, माधवराव आढागळे, अँड.अतुल चौरे, अँड. सदानंद गजभारे, मारोती काकडे, जनार्दन हाटकर, भिमराव साळवे, शेषेराव वाठोरे, संघपाल पाईकराव, लक्ष्मण जमदाडे, सामाजिक कार्यकर्ते संदिप भाऊ दवणे, साहेबराव नरवाडे व तळेगाव येथील रिपब्लिकन सेना शाखा पदाधिकारी , गावकरी, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या

# बडेवाडीत संत भगवान बाबा नारळी सप्ताहानिमित्त १० क्विंटल लाडूंची महापंगत!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बाळासाहेब खेडकर । पाथर्डी**

घाटशिळ पारगाव ता. शिरूर कासार जिल्हा बीड ग्रामस्थांच्या वतीने शुक्रवार दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी बडेवाडी येथे संत भगवान बाबा यांच्या ९२ व्या नारळी सप्ताहानिमित्त भव्य धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने पारगाव ग्रामस्थांकडून तब्बल १० क्विंटल लाडूंची महापंगत आयोजित करण्यात येणार असून परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या महापंगतीसाठी मोठ्या प्रमाणात लाडू तयार करण्याचे काम जोरात सुरू असून ग्रामस्थ स्वतः पुढाकार घेऊन नियोजन करत आहेत. सामाजिक एकोपा आणि भक्तिभाव याचे दर्शन घडवणारा हा उपक्रम ठरणार असून हजारो भाविक या महापंगतीचा लाभ घेणार आहेत.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील तरुण, ज्येष्ठ मंडळी तसेच महिला वर्ग मोठ्या उत्साहाने सहभागी झाले आहेत. संत भगवान बाबा यांच्या



कृपेने हा सोहळा अधिक भव्यदिव्य व्हावा, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त शालेय सामान्य ज्ञान परिक्षेच आयोजन

## हिमायतनगर तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा–रमेश पंडित

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिमायतनगर । लक्ष्मण शेन्नेवाड**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त भव्य शालेय सामान्य ज्ञान परिक्षेच आयोजन जयंती समीतीच्या वतीने करण्यात आले असुन हिमायतनगर तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन रमेश पंडित यांनी केले आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त दि १२ एप्रिल रोजी भव्य शालेय सामान्य ज्ञान परीक्षा बालाजी विद्यालय बोरगडी रोड हिमायतनगर येथे कनिष्ठ स्तर १० ते ११.१० तर वरिष्ठ स्तर ११.१० ते १२.४० वेळ एक तास दहा मिनिटे ठेवण्यात आला आहे.स्पर्धेचे वरिष्ठ



स्तर प्रथम बक्षीस ८००० रुपये रोख व्दितीय बक्षीस ५००० व तृतिय बक्षीस ३००० आहे तर कनिष्ठ स्तर प्रथम बक्षीस ५००० व्दितीय ३००० तृतीय २००० असे आहे परिक्षा शुल्क ५० रूपये राहणार असुन येण्या जाण्याचा खर्च हा परिक्षार्थी यांचा राहणार आहे परिक्षार्थी यांनी कृती समीतीच्या नियमाचे तंतोतंत पालन करावे परिक्षार्थीची निवड ही कृती समितीकडूनच केली जाईल कृती समितीचे परिक्षक म्हणून नागेश कोथळकर,मुजाहिद मिर्झा, सचिन कळसे,विजय धोंडे,विजय वाठोरे,एम.यु.हनवते, भिमराव हनवते ह्या शिक्षकांची निवड करण्यात आली असून जयंती समीती अध्यक्षपदी ऋषीकेश कदम उपाध्यक्ष मनोहर दादा कांबळे सचिव समाधान हनवते सहसचिव प्रविण हनवते कोषाध्यक्ष सिद्धार्थ लोखंडे यांची निवड करण्यात आली असून तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन रमेश पंडित यांनी केले आहे

# तहसील कार्यालयातील जप्त मुद्देमाल चोरी प्रकरणी आरोपी अटकेत

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट । शेख शौकत**

तहसील कार्यालयाच्या आवारातून जप्त केलेला मुद्देमाल चोरून नेणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अल्पावधीत अटक करून प्रकरणाचा छडा लावला आहे. गंगानगर येथील सोनू संजय माने याला मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले.

तहसील कार्यालयाच्या कंपाऊंडमधील खुल्या जागेत अवैध गौण खनिज प्रकरणात जप्त केलेला सुमारे ३१,५०० रुपयांचा मुद्देमाल ठेवण्यात आला होता. यामध्ये एक लोडिंग ऑटो आणि त्यातील अर्धा ब्रास रेतीचा समावेश होता. २१ मार्च २०२६ रोजी हा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे उघडकीस आले.

याप्रकरणी नायब तहसीलदार चंद्रशेखर सहारे



यांनी किनवट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली गुप्त माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीला अटक करण्यात आली. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपीकडून चोरीस गेलेला सर्व मुद्देमाल जप्त केला असून पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल दिलीप श्रीमनवार करत आहेत. या जलद कारवाईमुळे पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# देगलूर-मुखेड-बिलोली तालुक्यात बालाजी पाटील यांचा दौरा शिवसेनेला वाढती ताकद, स्थानिक राजकारणात हालचालींना वेग

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । संतोष चिद्रावार लोणीकर**

महाराष्ट्राचे मा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांचे खाजगी सचिव बालाजी पाटील खतगावकर यांनी नुकताच देगलूर, मुखेड व बिलोली या तीन तालुक्यांसह शहरी भागाचा दौरा करून अनेक माजी-आजी पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या भेटी घेतल्या. त्यांच्या या दौऱ्यामुळे शिवसेना पक्षाला नवसंजीवनी मिळाल्याचे चित्र दिसून येत आहे.

बालाजी पाटील यांनी अत्यंत विनम्र व प्रेमळ स्वभावाने सर्वांशी संवाद साधत स्थानिक समस्या, नागरिकांच्या अडचणी व संघटनात्मक बांधणी यावर चर्चा केली. त्यांच्या साध्या व आपुलकीच्या स्वभावामुळे अनेक नागरिक व पदाधिकारी प्रभावित झाले असून शिवसेनेप्रती सकारात्मक वातावरण



निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा दौरा पूर्वतयारीचा भाग तर नाही ना, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू असून विरोधकांनीही या दौऱ्याची दखल घेतल्याचे बोलले जात आहे.

देगलूर तालुक्यात मागील एक महिन्यापासून शिवसेना व युवासेना वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये विधी हेल्पलाईन (९७६३६८६७३७), पाणी पोई, तसेच नागरिकांच्या सोयीसाठी विविध जनसंपर्क उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून पक्ष संघटना मजबूत होत असल्याचे चित्र आहे.

बालाजी पाटील यांच्या दौऱ्यात देगलूर तालुक्यातील रमेशजी देशमुख शिळवणीकर यांच्या तब्येतीची विचारपूस करून जुन्या आठवणींना उजाळा दिला. तसेच प्रसिद्ध कादंबरीकार बाबू बिरादार सर यांच्या स्मृतीस अभिवादन करून त्यांच्या वारसांना धीर देत साहित्य व संस्कृतीप्रती आपली बांधिलकी त्यांनी व्यक्त केली. या भेटी विशेष चर्चेचा विषय ठरल्या.याच वेळी, उपजिल्हा प्रमुख व्यंकट पाटील, अशोक पाटील राजूरकर, युवासेना प्रमुख नामदेव पाटील सोबत डॉ. धुमाळे, डॉ. शिकारे आणि ॲड. अंकुशराजे जाधव यांनी शिवसेना पक्षात प्रवेश करून बालाजी पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला असून त्यांच्या सोबत संपूर्ण दौऱ्यात सक्रिय सहभाग नोंदवला.

एकूणच, देगलूर, मुखेड व बिलोली तालुक्यात शिवसेना पक्षाची ताकद वाढत असून आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा दौरा महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

# प्रशासनाने आश्वासन पुर्ण न केल्याने माधव शिंदे यांचे परत आमरण उपोषण




लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिमायतनगर । लक्ष्मण शेन्नेवाड**

शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासाठी नगरपंचायत प्रशासनाने जागा उपलब्ध करून द्यावी या मागणीसाठी स्वाभिमानी संभाजी ब्रिगेडच्या वतीने माधव किशनराव शिंदे यांनी ३१ मार्च रोजी उपोषण सुरू केले.यापुर्वी स्वाभिमानी संभाजी ब्रिगेडच्या वतीने १७ फेब्रुवारी रोजी माधव शिंदे व बालाजी ढोणे यांनी सतत चार ते पाच दिवस आमरण उपोषण केले असताना नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने एका महिन्याच्या आत जागा उपलब्ध करून देण्याचे लेखी आश्वासन देऊन नगराध्यक्ष व प्रशासनाने उपोषण सोडवले पण एक महिना उलटला तरी पण प्रशासनाने लेखी आश्वासन देऊन सुद्धा आश्वासन पुर्ण न केल्याने प्रशासनाने फसवणूक केल्यामुळे स्वाभिमानी संभाजी ब्रिगेड आक्रमक होत काही अनुचित प्रकार घडला तर यास प्रशासन जबाबदार असल्याचे निवेदन देऊन नगरपंचायत कार्यालयाच्या पटागणा बाहेर माधव शिंदे यांनी उपोषण सुरू केले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933